paripatrak

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्र/आस्था/३६८०
दिनांक २६/०७/२०२१

-: कार्यालयीन परिपत्रक :-

**विषय :- मा.लाड/पागे कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना घाणभत्ता वारस/अनुकंपा तत्वावरील नियुक्ती प्रकरणातील प्रतिज्ञापत्र व संमतीपत्रांबाबत**

संदर्भ :- अति.महा.आयुक्त(ज) ठ.क्र. २६१ ,दि. २६/०७/२०२१

पुणे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवरील सफाईसेवकांचे वयोपरत्वे/ऐच्छिक सेवानिवृत्ती/शारीरीकदृष्टया अपात्रतेच्या कारणास्तव सेवानिवृत्त/सेवेत असताना मयत इ. कारणास्तव रिक्त झालेल्या जागी त्यांचे एका पात्र वारसास मा.लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार मे.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार घाणभत्ता वारस हक्काने / अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची कार्यवाही करणेत येते.

संबंधीत वारसांचे नियुक्तीसाठी इतर खात्यांकडून आस्थापना विभागाकडे प्रस्ताव सादर केले जातात.सदर प्रस्तावामध्ये बंधपत्र,संमतीपत्र व इतर सर्व प्रकारची प्रतिज्ञापत्र हे स्टॅम्प पेपरवर नोटरी करून सादर केली जात आहेत. सदर प्रतिज्ञापत्राबाबत कालांतराने सेवानिवृत्त सेवकाची खोटी स्वाक्षरी केली अथवा फसवून स्वाक्षरी घेतली आहे या बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

उपरोक्त प्रकारच्या तक्रारी पुढील काळात उद्भवू नये या करीता संबंधित सेवकांच्या वारसांनी प्रस्ताव सादर करताना बंधपत्र,संमतीपत्र व इतर सर्व प्रकारची प्रतिज्ञापत्र हे महाराष्ट्र शासनाचे सेतू ,महा-ई-सेवा केंद्र या यंत्रणेमार्फत्त सादर करणे यापुढे अनिवार्य करणेत येत आहे.

तरी या कार्यालयीन परिपत्रकाच्या दिनांकापासून घाणभत्ता वारस हक्काने व अनुकंपा तत्वाने नियुक्ती देणेबाबतची प्रकरणे खात्याकडे प्राप्त होतील त्या वारस प्रकरणातील (घाणभत्ता व अनुकंपा) बंधपत्र,संमतीपत्र व इतर सर्व प्रकारची प्रतिज्ञापत्र हे महाराष्ट्र शासनाचे सेतू ,महा-ई-सेवा केंद्र या यंत्रणेमार्फत्त असल्याची खातरजमा करून प्रकरण आस्थापना विभागामार्फत सादर करणेची दक्षता घ्यावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
23/7/2021

प्रत :-
सर्व खातेप्रमुख,
महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी सादर